**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.सुरेश जोतीराम म्हमाणे
विरंगुळा साखर कारखान्यासमोर,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
कृष्णाश्रय कॉम्प्लेक्स, वखारभाग,
सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
कृष्णाश्रय कॉम्प्लेक्स, वखारभाग,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३५/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८/०५/२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८/०७/२००८ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७/०८/२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४/१०/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मुरघा राजेंद्र विरशैव लिंगायत बोर्डींग, सांगली या संस्थेच्या कामकाजाबाबत व न्यायालयीन प्रकरणासंदर्भातील एकूण ८ मुद्दे | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने

रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. सुरेश जोतीराम म्हमाणे यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.विपुल चंद्रकांत कुंडलिया
१८/१९६, आशियाना,
औद्योगिक वसाहत, माधवनगर रोड,
सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अध्यक्ष,**
श्री गुजराथी सेवासमाज,
२५०, वखारभाग, सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
श्री गुजराथी सेवासमाज,
२५०, वखारभाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८३५/२०१०/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १/०९/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७/१०/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** श्री गुजराथी सेवासमाज, सांगली या संस्थेच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दाखल झालेले अपील क्र.३/२००८ संदर्भात दाखल केलेल्या कागदपत्रांच्या छायाप्रती | |

**विवेचन**

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती 'सार्वजनिक प्राधिकरण' ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था ही 'सार्वजनिक प्राधिकरण'

ठरते, याचे पुरावे अपीलकर्ता श्री. .विपुल चंद्रकांत कुंडलिया यांनी आयोगास सादर केलेले नाहीत. त्यामुळे सदरचे अपील दखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे.**
**दि :-** 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.सारंग वामन यादवाडकर
प्लॅट नं.ए-९, (प्रज्ञांगत) अपार्टमेंट, स.नं.११९/३, सिंहगड रोड, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, कर आकारणी व
कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व
कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४ / २०१० / पुणें |
| २ | सुनावणीची तारीख | दि.९.४.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सारंग वामन यादवाडकर
प्लॅट नं.ए-९, (प्रज्ञांगत) अपार्टमेंट, स.नं.११९/३, सिंहगड रोड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त, कर आकारणी व
कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.विलास कानडे

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक कर आकारणी व
कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रामदास जाधव

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.११.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२३.११.२००९ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.१२.२००९ |

| | | |
|---|---|---|
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२२.१२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मिळकत करांसाठी चटई क्षेत्राच्या इंच-फुटातील कॅल्क्युलेटरमध्ये नोंदी भरण्याच्या महानगरपालिकेतर्फे अवलंबिण्यात येणाऱ्या पध्दतीसंबंधी योग्य माहिती मिळाली नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री.सारंग वामन यादवाडकर यांनी केली.

श्री.यादवाडकर यांनी मागितलेली माहिती अभिलेखातील नसून पध्दतीचे विश्लेषण करून देण्याची आहे. विशिष्ट मालमत्तेबाबत माहिती हवी असल्यास तसे कळविण्याबाबतचे उत्तर त्यांना दिले होते. नंतर स्पष्टीकरणात्मक माहिती देण्यात आली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रामदास जाधव यांनी केले.

जन माहिती अधिकाऱ्यांचे निवेदन रास्त आहे. तथापि नागरिकांच्या माहितीसाठी म्हणून अशी विश्लेषणात्मक माहिती सुनावणीच्या दिवशीच द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार पूर्तता केल्याचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कर आकारणी व कर संकलन प्रमुख, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.रामदास जाधव यांनी दि.१५.४.२०१० च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ — शिक्का)

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२८.४.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सातलिंग महादेव तवटे
मु.पो.मालगाव, ता.मिरज,
जिल्हा सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.),**
जिल्हा परिषद सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
प्रकाशबापू पाटील माध्यमिक विद्यालय, मालगांव,
ता.मिरज, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८४४/सांगली |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७/१०/२००८ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०/११/२००८ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

'जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्रकाशबापू पाटील माध्यमिक विद्यालय, मालगांव, ता.मिरज, जि. सांगली यांच्याकडून मागितलेल्या माहितीची आवश्यकता नसल्याने व कोणतीही तक्रार राहिली नसल्याने सदर अपील निकाली काढावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री. सातलिंग महादेव तवटे यांनी दि.१२/०४/२०१० च्या पत्रान्वये राज्य माहिती आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 20 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
मु.पो.ता.शिरोळ,
जि.कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम विभाग,
कोल्हापूर,

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम उपविभाग शिरोळ,
जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५/२०१०/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७/०४/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५/१०/२००९ |
| ४ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** नरसोबाचीवाडी, ता.शिरोळ येथे आमदार निधीतून करण्यात आलेल्या कामाचे अंदाजपत्रक, मोजमाप, वापरण्यात आलेले साहित्य व झालेला खर्च इ. माहिती | |

## विवेचन

'संबंधित माहिती मिळाली असून तक्रार राहिलेली नाही. अपील निकाली काढावे', असे अपीलकर्ता श्री. प्रसाद गणपतराव धर्माधिकारी मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी दि.७/०४/२०१० च्या पत्रान्वये आयोगास कळविले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 26 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. गालिब अल्ताफभाई इनामदार
पी.एम.टी. स्टॉप जवळ, सासवड
ता.पुरंदर, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगरपरिषद सासवड, ता.पुरंदर,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
नगरपरिषद सासवड, ता.पुरंदर,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५५/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९/१२/२००९, २७/०१/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८/०१/२०१०, ११/०२/२०१० |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६/०२/२०१० |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सासवड नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्व्हे नं. २८१४ या गाडीतळासाठीच्या आरक्षित जागेवरिल अतिक्रमणाबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. गालिब अल्ताफभाई इनामदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र ★ पुणे खंडपीठ. ★

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.अशपाक शौकत मुजावर
६९८, ई-वॉर्ड, लाईन बजार, पद्मा पथक समोर,
कोल्हापूर  अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार,
ताराराणी पार्क, कोल्हापूर  **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** वरिष्ठ लिपिक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार,
ताराराणी पार्क, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८५९/२००९/कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१०.०२.२०१० |
| ३. | **उपस्थित**<br>**अपीलकर्ता** श्री.अशपाक शौकत मुजावर<br>६९८, ई-वॉर्ड, लाईन बजार, पद्मा पथक समोर, कोल्हापूर<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा** व्यवस्थापक,<br>शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार,<br>ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.द.भा.भावे<br><br>**जन माहिती अधिकारी तथा** वरिष्ठ लिपिक,<br>शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार,<br>ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.ज्ञानेश महिपती माने | |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३१.०१.२००९ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१३.०२.२००९, १२.०३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.५.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर येथील मजूर पदाच्या भरतीबाबतची माहिती आपण वारंवार मागूनही उशिरा व अपूर्ण दिली. कोणत्या वृत्तपत्रांमध्ये जाहिरात दिली होती, त्यांची नावे दिली नाहीत. मजूर पदासाठी लेखी व तोंडी परीक्षा घेण्याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.अशपाक शौकत मुजावर यांनी केली.

अपीलकर्ता श्री.अशपाक शौकत मुजावर यांनी मंत्रालयात अर्ज केला होता. त्यांच्याकडून तो अर्ज दि.१६.०२.२००९ रोजी आपल्याकडे आला व दि.१२.०३.२००९ रोजी माहिती दिली. श्री.मुजावर यांनी मागितलेली माहिती त्यांना वेळोवेळी दिलेली आहे. भरतीसाठी वृत्तपत्रात जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर यांच्यामार्फत जाहिरात दिली असल्यामुळे वृत्तपत्रांची नावे दिलेली नाहीत. इतर उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती, तसेच अनेक बाबींचे स्पष्टीकरण व खुलासे श्री.मुजावर यांनी मागितले असून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत ते येत नाहीत. तसेच विशिष्ट नमुन्यात माहिती संकलित करुन देण्याची त्यांची मागणी असून त्यानुसार संकलन करुन देणे शक्य नाही, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार, ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.ज्ञानेश महिपती माने व अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार, ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.द.भा.भावे यांनी केले.

मजूर भरतीबाबतच्या सन २००४ च्या शासन निर्णयाची प्रत, भरतीबाबत जाहिरात दिलेल्या वृत्तपत्रांची नावे, गुणपत्रिकेची यादी ही माहिती अपीलकर्त्यास तीन दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. भरतीप्रक्रियेत अनियमितता असल्याची अपीलकर्त्याची तक्रार, तसेच खुलासा, अन्वयार्थ याची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

श्री.मुजावर यांना दि.२६.०२.२०१० रोजी सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती शुल्क आकारुन देण्यात आल्या, असे अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार, ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.द.भा.भावे यांनी दि.५.०३.२०१० च्या नुसार आयोगास अवगत केले. परंतु आपल्याला योग्य माहिती मिळाली नाही. कार्यालयात गेल्यावर कर्मचारी आपल्या भोवती

गोलाकार उभे राहून धमकी देतात. त्यामुळे रजिस्टर टपालाने माहिती मिळावी, अशी मागणी श्री.मुजावर यांनी दि.१७.०३.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली.

श्री.मुजावर यांनी केलेल्या तक्रारींबाबतच्या वस्तुस्थितीचा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार,ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.द.भा.भावे यांनी करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य.

२. अपीलकर्ता श्री.अशपाक शौकत मुजावर यांनी दि.१७.०३.२०१० च्या पत्रात केलेल्या तक्रारीबाबतचा खुलासा त्यांना दिलेल्या माहितीच्या छायांकित प्रतींसह अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामुग्री भांडार, ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.द.भा.भावे यांनी दि.१०.०५.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि.** 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अरुण रतनसिंग परदेशी
मु.पो.बोडकेनगर, जुन्नर, ता.जुन्नर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी,**
पुणे

**उत्तरवादी**

**१) जन माहिती अधिकारी,**
जुन्नर नगरपालिका परिषद कार्यालय,
जुन्नर, जि.पुणे
**२)** निवासी नायब तहसीलदार,
जुन्नर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८६७/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** जुन्नर येथील दादोजी कोंडदेव वाडयाच्या उत्खननासंदर्भातील माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. अरुण रतनसिंग परदेशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 29 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. सुधाकर तुकाराम बोराटे
संतसावतामाळीनगर, मु.पो.इंदापूर,
जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय बारामती,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उपविभाग इंदापूर जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८७९/२०१०/पुणे |
| २ | **माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणा-या माहितीचा बोध होत नाही.** | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. सुधाकर तुकाराम बोराटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिका-यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं.१५४, सेक्टर १९,
कोयनानगर, चिंचवड,
पुणे-४११०१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११०१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (उद्यान-स्थापत्य),**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-४११०१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८८०/२०१०/पुणे<br>८८१/२०१०/पुणे<br>९४६/२०१०/पुणे |
| २ | अपिलासोबत माहिती-मागणी अर्ज जोडलेले नसल्याने आवश्यक असणाऱ्या माहितीचा बोध होत नाही. | |

<u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

वरील तिन्ही अपिले निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री हरिचंद्र रंगराव मुकटे
मु. पो. जामगाव (आ.),
ता. बार्शी, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कृषि अधिकारी (विघयो),**
पंचायत समिती बार्शी,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत जामगाव (आ.),
ता. बार्शी, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९९/२०१०/सोलापूर |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.१.२०१० |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.२.२०१० |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** घर जागा नं २२ व २३ या मिळकतीवर श्री. इंद्रजीत रावण मुकटे व श्री. रावण नरहरी मुकटे यांची नावे कोणत्या दस्ताऐवजाच्या आधारे लावली त्यांच्या प्रती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. हरिचंद्र रंगराव मुकटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

पुणे
दि. 30 APR 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जयवंत गुणवंत सोनवणे
मु.पो.टेंभूर्णी (भवानी नगर),
ता.माढा, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,**
विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग,
समाजकल्याण संचालनालय,
चर्च रोड, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२६/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६/११/२००९ |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय टेंभूर्णी यांचे-बाबत विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. जयवंत गुणवंत सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकाऱ्यांचे उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याकडे अपील केले नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 29 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कोंडिबा रामा जाधव
रा.मानेगांव, पो.वैराग,
ता.बार्शी, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता (सोमंका.),**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
सोलापूर मंडळ कार्यालय, उर्जा नगर, मुरारजी पेठ,
सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक व्यवस्थापक (क-सांगली),**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडळ कार्यालय, विश्रामबाग, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२७/२०१०/सोलापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २/०६/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०/०७/२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९/११/२००९ |
| ५ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** रोजंदारीच्या ८९८ दिवस व २९५ दिवस या कालावधीतील मोबदल्याच्या अनुषंगाने माहिती | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. कोंडिबा रामा जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नाहीत, तसेच जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी माहितीबाबत योग्य कार्यवाही केली आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 APR 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. महादेव आणप्पा चौगुले
मु.पो.टेंभूर्णी (बेंबळे रोड),
ता.माढा, जि.सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा संचालक,**
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग,
समाजकल्याण संचालनालय, चर्च रोड,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२७/२०१०/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा व ज्युनिअर कॉलेजवरिल प्रशासकाच्या नियुक्तीबाबतची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. महादेव आणप्पा चौगुले यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने, तसेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे अपील केले नसल्याने आयोगाकडे दाखल केलेल्या या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 30 APR 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. नारायण बाबुराव सुतार
१००५/३, राजेंद्रनगर,
शिवगौरी सोसायटी,
महानगरपालिका कॉलनी,
पुणे-३०

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा नगर उप अभियंता,**
झोन क्र.२, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता,**
बांधकाम नियंत्रण/ विशेष योजना,
झोन क्र.३, पुणे महानगरपालिका,
शिवाजीनगर, पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९३०/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८/१/२०१०, १६/२/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२/१/२०१०, ८/३/२०१० |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५/३/२०१० |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६/३/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** नगर रचना झोन क्र.३ मध्ये समाविष्ट भाग, क्षेत्र, जागेच्या मालकीच्या नोंदी इ.बाबत खुलासेवजा माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. नारायण बाबुराव सुतार यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
**दि :-** 29 APR 2010